**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –4, May - 2011**
**ISSN:-** 2230-7850 Available online at www.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# धुळे नगरपालिकेने चालविलेल्या प्राथमिक शाळा व उपक्रम

**अनिल माणिकराव बैसाणे**

इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

## प्रस्तावना :

धुळे नगरपालिका शिक्षण मंडळाने आपल्या शैक्षणिक प्रगतीत सन 1968 वर्षी एक पाऊल पुढे टाकले ते म्हणजे नगरपालिकेची पहिली माध्यमिक शाळा होय. ही माध्यमिक शाळा नगरपालिका प्राथमिक शाळा क्रं.1 च्या आवारात भरविली जात होती. आजही त्याच ठिकाणी विद्यादानाचे कार्य करीत आहे. त्या शाळेची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

सन 1980 यावर्षी इयत्ता 5 वी ते 10 वी असे वर्ग सुरू होते. त्यात शिक्षण घेणाऱ्या एकूण मुलांची संख्या 344 होती. विशेष गोष्ट म्हणजे या माध्यमिक शाळेत सन 1968 ते 1990 पर्यंत एकही मुलगी प्रवेशित नव्हती. सन 1980 यावर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांना 12 शिक्षक या शाळेत अध्यापनाचे कार्य करीत होते. सन 1990 या वर्षापर्यंत विद्यार्थ्यांच्या एकूण संख्येत फक्त चार ने फरक पडला होता. या वर्षाची विद्यार्थी संख्या 348 होती व शिक्षक संख्या ही 12 होती.[1]

नगरपालिका माध्यमिक शिक्षण क्षेत्रातील आतापर्यंतच्या इतिहासातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे सन 2000 या वर्षापर्यंत विद्यार्थिनीही शाळेत प्रवेशित झाल्या होत्या. यावर्षी 338 मुले व 60 मुली अशी एकूण 398 विद्यार्थी माध्यमिक शिक्षण घेत होती. शिक्षक संख्या मात्र 12 होती.

धुळे नगरपालिकेने शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान केलेले असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळपासून ज्या खाजगी माध्यमिक शाळा शहरात सुरू झाल्या होत्या त्यांनाही अनेक रूपात धुळे नगरपालिकेने सहाय्य केले होते. उदा. पैसे, जमिनी, वह्या पुस्तके, पाटी–पेन्सिल, गरीब विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, गणवेश इत्यादी वेळोवेळी सहकार्याची भावना ठेवून धुळे शहरात शिक्षणाचे वारे कसे वाहतील हा हेतू डोळ्यासमोर ठेवून नगरपालिकेने खाजगी माध्यमिक शाळांना केलेले योगदान लाभदायकच ठरलेले दिसून येते. त्यात स्वातंत्र्यपूर्व कालीन माध्यमिक शाळांमध्ये गरूड हायस्कूल, धुळे एज्युकेशन सोसायटी, कमलाबाई शंकरलाल कन्या शाळा, शिवाजी विद्याप्रसारक संस्था इत्यादी ठिकाणी सुरू होत्या.

तसेच स्वातंत्र्योत्तर काळानंतर खाजगी व प्राथमिक व माध्यमिक शाळांची झपाट्याने वाढ झालेली आहे. शहरात अनेक माध्यमिक खाजगी शाळा सुरू झाल्या. नगरपालिकेच्या योगदानामुळे धुळे शहर शैक्षणिक केंद्र झाल्याचे दिसून येते.[2]

अशाप्रकारे नगरपालिका माध्यमिक शाळेचा इतिहास होय. धुळे नगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची प्रगती ही एकेकाळी मोठ्या प्रमाणावर होती. या शैक्षणिक प्रगतीत अनेक लोकांचा सिंहाचा वाटा होता. त्यात शासकीय व अन्य अशी अनेक लोक होती. पण त्यातल्या त्यात या क्षेत्रात शिक्षकांचे योगदान मोलाचे ठरते. प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पाया मानला जातो. प्राथमिक शाळेत येणाऱ्या बालकास शिक्षकाने ज्याप्रमाणे घडविले त्याप्रमाणे तो घडत असतो. एखाद्या विशिष्ट शिक्षकाचा त्याच्यावर प्रभाव असावा, म्हणून प्राथमिक शिक्षणात एक वर्ग एकच शिक्षक शिकवितात. आपल्याला दररोज शिकविणाऱ्या शिक्षकांचा आदर्श तो निष्पाप बालक घेत असतो. त्यामुळे शिक्षकाला आपले आचरण, आपले विचार, आपले ज्ञान चांगले अद्ययावत ठेवावे लागते. लहान मुलांना वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान देण्यासाठी शिक्षकांना ते ज्ञान अगोदर आत्मसात करावे लागते. कोणत्याही मार्गाने हे ज्ञान शिक्षकास मिळवून घ्यावे लागते. प्राथमिक शाळेतील बालकांवर ज्या विचारांचा प्रभाव पडतो तो विचार घेवून तो मोठा होतो. म्हणजेच देशाचे भावी नागरिक, भावी पिढी घडविण्याचे काम शिक्षकांना करावे लागते. धुळे नगरपालिका प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी ज्ञान मिळविण्यात व ज्ञान देण्यात तसेच इतर अनेक शैक्षणिक कार्यात पुढेच होते. या शाळेतील प्राथमिक शिक्षकांनी अनेक परीक्षा पास केल्या होत्या. विविध प्रकारचे पदविका अभ्यासक्रम पूर्ण केले होते. त्यात एस.एस.सी., हिंदी सनद, सी.पी.टी.सी, प्रबोधन शारीरिक शिक्षण कोर्स, स्काऊट, इंटर मिडीएट, कताई, विणकाम, लाकूड काम

अशा व्यावसायिक शिक्षणाची योग्यता ही त्यांनी प्राप्त केलेली होती. या व्यतिरिक्त अनेक सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातही शिक्षकांची मोलाची कामगिरी होती. विविध प्रकाराचे शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जात होते. त्यात प्रामुख्याने सांस्कृतिक कार्यक्रम, गीत गायन, स्पर्धा, समाज प्रबोधनाचे कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मता कार्यक्रम, वृक्षारोपन, महिला संत मेळावा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला.[3]

धुळे नगरपालिका आपल्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांसाठी शासनाकडून व नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडून विविध उपक्रम राबविले जात. शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात आलेला अभ्यासक्रम नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या शाळांमधून सुरू करण्यात येत. अभ्यासक्रमानुसार शिक्षकांना शैक्षणिक कामे, कृतीसंत्र, क्रमिक पुस्तके, पुरवणी, वाचनीय पुस्तके, नकाशे, तक्ते, साहित्य वगैरे खरेदी करून शाळेला दिली जात. सरावपाठ एन.सी. ई. आर. टी सेवांतर्गत कोर्स वगैरेंसाठी शिक्षक पाठविले जात. अशाप्रकारे शैक्षणिक प्रगती साधली जात असे.

शारीरिक शिक्षण, ग्रामशिक्षण, लोकशिक्षण, हिंदी, इंग्रजी, मुलोद्योग, लाकूडकाम, पुठ्ठाकाम व शासकीय ध्येय धोरणानुसार या मंडळाच्या शाळांमधून शिक्षण दिले जात होते. या शिवाय मंडळाने संगीत शिक्षक, शिवणकाम शिक्षकांची नेमणूक नगरपालिका शिक्षण मंडळाकडून केली जात असे.

शैक्षणिक प्रगती गुणवत्ता वाढीसाठी शैक्षणिक गटसंमेलने, कृतीसत्रे, चर्चासत्रे, वर्गवार शैक्षणिक साहित्य निर्मिती व त्या साहित्याचा दैनंदिन अध्यापनात उपयोग इत्यादीसाठी हे मंडळ कार्यरत होते. नगरपालिका शिक्षण मंडळाच्या या विविध कामांबरोबरच शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांचे सहकार्य न विसरण्यासारखे होते. म्हणून नगरपालिका शिक्षण मंडळाबरोबरच नगरपालिका प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांचे कार्य देखील स्पृहणीय होते.

प्राथमिक, माध्यमिक शाळांची अधिक प्रगती व्हावी म्हणून नगरपालिका शाळेतील मुख्याध्यापकांनी 20 कलमी रेखीव कार्यक्रम राबविला होता. त्यात

1) शाळेची इमारत व आवार स्वच्छ ठेवले जावे.
2) शाळेला बाग, प्रशस्त क्रीडांगण व प्रसन्न परिसर असावा.
3) शालेय वयाची मुले शाळेत आणली जावी, त्यांची हजेरी टिकवावी, गळती थांबवावी.
4) अभ्यासक्रम व शालेय जीवनात अनुसरून शालेय कामात विविधता व व्यापकता असावी.
5) शिक्षकांनी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके अभ्यासून उद्दिष्टे साध्य करावीत.
6) वर्गवार विषयावर गट पाडून अभ्यासक्रमाचा विचार केला जावा. तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.
7) वर्गवार व विषयवार शैक्षणिक साहित्य तयार करावे.
8) इंग्रजी, गणित, विज्ञान या विषयात मुलांची उत्तम तयारी करून घेण्याचा व्यापक कार्यक्रम तयार करावा.
9) चित्रकला, गायन, अभिनय, खेळ, लेखन या विषयांद्वारे मुलांच्या उपजत गुणांना उत्तेजन द्यावे व मार्गदर्शन करावे.
10) बुद्धिमान मुलांना मार्गदर्शन करून स्कॉलरशिप परीक्षेस बसवावे तसेच अभ्यासात मागे असलेल्या मुलांना इतर मुलांच्याबरोबर आणावे.
11) मुलांना स्वयंशिक्षणाची सवय लागावी म्हणून अध्यापन व्यवसाय प्रदान करणे.
12) वर्गाच्या वार्षिक कामाचे नियोजन करावे. पाहणी प्रगती, उद्दिष्टे यासाठी मूल्यमापनाचा उपयोग करावा.
13) परिपाठाचे नियोजन करावे, तो प्रभावी व विविधांगांनी युक्त असा घेतला जावा. अभ्यासक्रमाबाहेरील सहशालेय उपक्रमांचा त्यात अंतर्भाव असावा.
14) निरनिराळ्या स्पर्धा, प्रदर्शने, हस्तलिखिते, काव्यगायन, बालसभा इत्यादींचे नियोजन व कार्यवाही पद्धतशीर व्हावी.
15) क्रीडा स्पर्धा, सहली, वननिवास, बालवीर, वीरबाला पथक, प्रथमोपचार या सबंधीचे आयोजन व कार्यवाही व्हावी.
16) सहकारी वस्तुभांडार स्वयंशिक्षका शालेय पतपेढी यशस्वीरित्या चालवावी.
17) ग्रामसफाई, रस्ता, पाणवठा, दुरुस्ती ही श्रमदानाची कामे सांघीकरित्या करावी.
18) गृहवर्ग चालवून साक्षरता प्रसार करावा. सार्वजनिक वार्ताफलक लिहावा. वर्तमान पत्रांचे वाचन करावे.
19) युवक मंडळे, कला पथके स्थापन करावे.
20) शिक्षकांनी व्यवसायास पोषक आचरण ठेवावे.4

या व्यतिरिक्त माननीय शिक्षण संचालक, महाराष्ट राज्य यांनी प्राथमिक शिक्षकांसाठी शिक्षण विकासाचा 11 कलमी कार्यक्रम देखील राबविला होता. ती 11 कलमे याप्रमाणे होती.

1) वर्गातील हजेरी सुधारणे.
2) अध्ययन अध्यापन आनंददायी व खेळकर करणे.
3) मुले संस्कारीत करणे.
4) गरजू मुलांना मदत मिळवून देणे.

5) शालेय कामे वेळेच्या वेळी करणे.
6) स्वतःचा शैक्षणिक साहित्य संग्रह तयार करणे.
7) स्वतःची व्यावसायिक उंची वाढविणे.
8) व्यावसायिक अनुभवांची नोंद ठेवणे.
9) शालेय परिसराची प्रसन्नता राखणे.
10) समाज विकासाच्या उपक्रमात सहभागी होणे.
11)काही नेहमीपेक्षा अधिक किंवा वेगळे करणे.

वरील कार्यक्रम प्राथमिक शिक्षक व त्यांच्या राज्यसंघटनेचा होता. हा कार्यक्रम राबविण्याचे आवाहन शिक्षण संचालकांनी केले होते. कारण त्यांचे असे म्हणणे होते की, प्रत्येक शिक्षकाने किमान एवढे केले म्हणजे गुणवत्तेच्या दिशेने झेप घेणे महाराष्ट्रातील प्राथमिक शाळांना व शिक्षकांना कठीण जाणार नाही.[5]

धुळे नगरपालिका शिक्षण मंडळातील अनेक शिक्षकांना आपल्या विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार प्राप्त झाले होते. त्यात आदर्श शिक्षक, शिक्षिका, हिंदी सिनियर सनद, हस्ताक्षर स्पर्धा, उत्कृष्ट निकाल, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, क्रीडास्पर्धा, हस्तकला, होमगार्ड सेवा, उत्कृष्ट जनगणनाकार्य मुलोद्योग काम, संगीत खुर्ची, होमगार्ड फायरिंग, सांस्कृतिक कार्यक्रम, सूतकताई, आदर्श होमगार्ड, नेमबाजी इत्यादी प्रकारात शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा गौरव केला जाई.[6]

**संदर्भसूची**

1. ***Maharasthra State Gazetteer*** Dhulia District, 1974. Page 798.
2. ***तत्रैव.***
3. नाशिककर क. वी., ***धुळे नगरपालिका शतसंवत्सरी महोत्सव ग्रंथ***, धुळे नगरपालिका, 1962, पृ. 01.
4. ***Maharasthra State Gazetteer*** Dhulia District, 1974. Page 798-99.
5. नाशिककर क. वी., ***उपरोक्त***, पृ. 4.
6. ***महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय धुळे जिल्हा***, जिल्हा पब्लिसिटी ऑफीस, धुळे 1961, पृ. 18.



**अनिल माणिकराव बैसाणे**
इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .